# राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक. रानिआ-१०९७/ ८००३/९७ पंरा
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.

दिनांक ४ डिसेंबर १९९७

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी

विषय.—ग्रामपंचायत निवडणूका संदस्याचे निकाल जाहीर करणे.

राज्य निवडणूक आयोगाच्या पुढीलप्रमाणे निदर्शनांत आले आहे की—

(अ) मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ चे नियम ३७ चे परंतुकामध्ये असलेल्या तरतुदींनुसार निवडून आलेल्या सदस्याच्या नावातील चूका प्रसिद्धी पूर्वी दुरुस्त करावयाची तरतूद असून देखील उक्त नियमाच्या नियम ३७ अन्वये काटेकोरपणे पूर्व तपासणी न करता निर्वाचित ग्रामपंचायत सदस्यांची नावे प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत.

(ब) राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शनानुसार विधीवत निर्वाचित उमेदवारांचे नाव घोषित करण्याऐवजी अन्य पराभूत उमेदवाराचे नाव निर्वाचित म्हणून घोषित केले.

(क) उक्त नियमाच्या नियम ३४(२) अंतर्गत तरतूदीचा चुकीचा अर्थ लावून राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनानुसार निर्वाचित घोषत करावयाच्या सर्वसाधारण उमेदवाराऐवजी राखीव पदावरील म्हणजे ज्या उमेदवाराने सर्वसाधारण पदावर नामनिर्देशन पत्र भरले नाही. अशा उमेदवाराला निर्वाचित म्हणून घोषित केले.

२. मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ च्या नियम ३७ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या उमेदवारांच्या नावामधील किरकोळ व मोठ्या स्वरुपाच्या चुका बॉम्बे जनरल क्लॉजेस ॲक्ट १९०४ मधील कलम २१ अन्वये शुद्धीपत्रक काढून दुरुस्त करण्यात याव्यात.

३. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील नियम ३७ अन्वये निकाल प्रसिद्ध करण्यापूर्वी अशाप्रकारे निर्वाचित घोषित करावयाच्या उमेदवाराच्या नावामध्ये चुका करणाऱ्या दोषी निवडणूक निर्णय अधिकारी तहसिलदार व कर्मचारी याना ताबडतोब निलंबित करून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास तात्काळ पाठवावा.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

**(अपर्णा जोशी)**
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग.